जा.क.मृदस/मृद-4/गपाविका/अनुदान/14-15/974 /14

मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृ.आ.म.रा.

पुणे-411001 **दिनांक: 6 जून 2014**

**प्रति,**

**1) विभागीय कृषि सह संचालक (सर्व)**

**2) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

**विषय:- गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम सन 2014-15**

**संदर्भ** :- शासन निर्णय क्र.आदर्श 2007/प्र.क्र. 121/जल-7 दि. 30.11.2007

अकराव्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आल्यानुसार कृषि विकासाचा दर 4 टक्के करणे अभिप्रेत असून त्यासाठी केंद्र शासनाने उचललेल्या अनेक उपाययोजनेत मृद व जलसंधारण योजनेस महत्व देण्यात आलेले आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने संदर्भीय शासन निर्णयान्वये मागील सहा वर्षात **गतीमान पाणलोट विकासाचा धडक कार्यक्रम** राबविलेला आहे. कार्यक्रमांतर्गत राज्यात सन 2007-08 पासून सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या एकूण 6449 पाणलोटांपैकी 2922 पाणलोट पूर्ण झालेले आहेत. मागील सात वर्षाप्रमाणे सन 2014-15 मध्ये देखील हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

## 1) पाणलोट निवड

**अ)** कृषि आयुक्तालयाचे स्तरावर सन 2013-14 या वर्षात क्षेत्रिय स्तरावरुन प्राप्त पाणलोटाच्या यादीस सुकाणू समितीच्या दि. 09/01/2014 च्या सभेमध्ये 599 पाणलोटांना मान्यता दिली असून त्यातील आपले विभाग/ जिल्हयाची यादी आपणांस यापूर्वीच पाठविलेली आहे.

सन 2014-15 मध्ये विविध योजनांतर्गत जिल्हा नियोजन व विकास समिती (जिल्हास्तर), आदिवासी उपयोजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना व विशेष घटक योजना (डीपीडीसी, टीएसपी, ओटीएसपी, विघयो) उपलब्ध निधीतून प्रथमत: मागील अपूर्ण राहिलेल्या पाणलोटांची जिल्हास्तरावर छाननी करुन आतापर्यंत गतिमान योजनेअंतर्गत सुकाणू समितीने मंजूर केलेले मात्र **अपूर्ण असलेले सर्वच सूक्ष्म पाणलोट** सन 2014-15 मध्ये प्राधान्याने पूर्ण होतील याबाबत नियोजन करावे. तद्नंतर सुकाणू समितीच्या मान्यतेच्या इतर पाणलोटांतील कामाचे नियोजन करावे. यासाठी जिल्हास्तरावर प्रत्येक तालुक्यातील सुकाणू समितीने मान्यता दिलेले व जास्तीत जास्त पूर्ण झालेल्या गतिमान पाणलोटांची यादी उतरत्या क्रमाने तयार करावी. त्यामध्ये आदिवासी उपयोजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना व विशेष घटक योजना (टीएसपी, ओटीएसपी, विघयो) यांचे लाभार्थी असणारे पाणलोटांना सन 2014-15 च्या कार्यक्रमात निधी वितरीत करतांना प्राधान्यक्रम (टीएसपी, ओटीएसपी, विघयो) देण्यात यावा, व अशा गतिमान पध्दतीने पूर्ण करावयाच्या पाणलोटांना विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांचे स्तरावर मान्यता दयावी. जिल्हा नियोजन व विकास समिती, (जिल्हास्तर) योजनेच्या निधीतून जिल्हानिहाय घ्यावयाचे पाणलोट हे सुकाणू समितीने मंजूर केलेल्या पाणलोटांच्या यादीतीलच असतील याची खात्री करुनच नियोजन करावे. या निधीतून एकेरी पध्दतीने कामे हाती घेण्यात येवू नयेत.

ब) मृद संधारण विभागामार्फत राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, ग्रामीण पायाभूत विकास निधी (आरआयडीएफ), एकात्मिक पाणलोट विकास व्यवस्थापन, पश्चिम घाट विकास कार्यक्रम अंतर्गत मेगा पाणलोटाअंतर्गत निश्चित केलेल्या क्षेत्रात गतिमान पाणलोटाचा कार्यक्रम घेवू नये.

क) सन 2014-15 साठी राज्यस्तर योजनेचा रु. 35.00 कोटी निधी शासनाकडे प्रस्तावित करण्यात आलेला असून, या निधीतून घेण्यात येणा-या व सुकाणू समितीने मान्यता

दिलेल्या तालुकानिहाय निवड झालेल्या पाणलोटाची यादी शासनाच्या मान्यतेनंतर यथावकाश आपणांस कळविण्यात येईल.

## 2) अंमलबजावणी

जिल्हयातील सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटात कामे पूर्ण करण्यासाठी जलसंधारण विभागाच्या दि. 10/10/2013 व 15/10/2013 च्या शासन निर्णयानुसार आर्थिक मापदंड विचारात घेण्यात यावेत.

पाणलोटातील प्रस्तावित क्षेत्र उपचाराच्या बाबीसाठी जागा निवड, सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रक तयार करणे, अंदाजपत्रकास मंजूरी देणे, प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी करणे या सर्व बाबी प्रचलीत कार्यपध्दतीनुसारच करण्यात याव्यात. तथापि ओघळ नियंत्रणाच्या माती नाला बांधाच्या व सिमेंट नालाबांधाच्या जागांची निवड अनुक्रमे तालुका कृषि अधिकारी व उप विभागीय कृषि अधिकारी यांनीच करणे अनिवार्य करण्यांत येत आहे.

## 3) कामाचे वेळापत्रक

सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटातील उपचार पूर्ण करणेसाठीचे वेळापत्रक खालील प्रमाणे राहील

1) सन 2014-15 साठी पाणलोट / गावाची निवड करणे - 31/08/2014
2) मंजूर उपचाराचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे. - 15/09/2014
3) उपचारास तांत्रिक मान्यता देणे. - 30/09/2014
4) जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतील पाणलोट उपचारांना मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता घेणे - 15/10/2014
5) पाणलोट पुर्ण करणे. - 31 मार्च 2015

## 4) निधीची उपलब्धता

अ) कार्यक्रम राबविण्यासाठी येणारा खर्च सन 2014-15 मध्ये मंजूर केलेल्या निधीतून भागविण्यात यावा. यासाठी जिल्हयांतील निवडलेल्या सर्व पाणलोटासाठी आवश्यक रक्क्म प्रथम निश्चित करावी, नंतर सन 2014-15 या आर्थिक वर्षासाठी जिल्हयास विविध राज्य योजनांतर्गत जिल्हानियोजन व विकास समिती (जिल्हास्तर) आदिवासी उपयोजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना व विशेष घटक योजना (डीपीडीसी, टीएसपी, ओटीएसपी, विघयो) उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचे पाणलोट निहाय नियोजन करण्यात यावे.

**अ)** डीपीडीसी सर्वसाधारण योजनेच्या अनुषंगाने शासनाने जिल्हाधिकारी यांना पाठविलेल्या पत्र क्र. असक/2008/प्र.क्र.64/जल-11 दि. 7.2.2009 अन्वये पाणलोट प्रकल्पनिहाय निधी मंजूर करण्याबाबत सूचना दिल्या असून सदर पत्राची प्रत आपणांसही पृष्ठांकित केलेली आहे. त्याअनुषंगाने आयुक्तालयाचे पत्र क्र. मृदस/मृद 4/गपाविका/निधी/583/09 दि. 24.02.2009 अन्वये आपणांस सविस्तर सूचना दिलेल्या आहेतच. त्यानुसार गतिमान योजनेचे सुकाणू समितीच्या मान्यतेचे पाणलोट निवडून मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करावेत.

**ब)** ज्या जिल्हयांमध्ये विशेष घटक योजना, आदवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी योजनेचा निधी अर्थसंकल्पीत झालेला आहे, अशा जिल्हयांमध्ये सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटांमध्ये अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीचे लाभार्थ्यांच्या शेतावर मृद संधारणाची वैयक्तिक लाभाची/सार्वजनिक लाभाची कामे करण्यात यावीत. अर्थसंकल्पीत निधीपेक्षा जास्तीचा निधी आवश्यक असल्यास पुरवणी मागणीद्वारे जादा निधीची मागणी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात यावी. जिल्हास्तरावर जादा निधी उपलब्ध न झाल्यास जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने अतिरिक्त निधी मागणीचे प्रस्ताव विभागीय कृषि सहसंचालक यांनी वेळेत आयुक्तालयास सादर करावेत.

## 5) कामाचे सनियंत्रण

सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटातील प्रस्तावित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील. मात्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे नियंत्रण अधिकारी म्हणून काम पहातील. यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांना प्रत्येक आठवडयात किमान एक वेळ गतिमान पाणलोटास भेट देऊन कामंाचे नियोजन आणि सुरु असलेल्या कामंाची गुणवत्ता तपासणी अनिवार्य करण्यात येत आहे. त्यांच्या भेटीची टिपणी त्यानी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना त्वरीत सादर करावी. निवडलेल्या पाणलोटातील कामाच्या नियोजन, गुणवत्ता व उपयोगिता याबाबत आलेल्या तक्रारीची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांच्यावर राहील याची त्याना जाणीव करुन देण्यात येत आहे. थोडक्यात हा कार्यक्रम सर्वार्थाने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या मार्फत राबवावयाचा आहे.

## 6) कामाचा आढावा

या योजनेच्या कामाचा आढावा जिल्हा स्तरावरील जिल्हा पाणलोट विकास समितीमार्फत दर महा घेण्यात येईल.

## 7) प्रगती अहवाल

पाणलोट निहाय प्रगती अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांनी दरमहा 5 तारखेस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने 7 तारखेस विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयास सादर करावे. विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने विभागातील जिल्हा निहाय, पाणलोट निहाय स्ंाकलीत प्रगती

अहवाल फॅक्स व ई-मेल व्दारे कोणत्याही परिस्थितीत 10 तारखेस कृषि आयुक्तालयास सादर करावेत.

त्याचप्रमाणे सन 2007-08 पासून कार्यक्रमाचे मुल्यमापन करण्यासाठी आयुक्तालयाचे पत्र जा.क्र. 1850 दि. 5 जूलै 2011 अन्वये विहीत प्रपत्रातील, आपणांकडून मागविण्यात आलेली माहिती आयुक्तालयास ई-मेल द्वारे सादर करावी.

## 8) इतर

**अ)** मुद्दा क्र. 2 मधील परिच्छेद-2 मधील माती व सिमेंट नाला बांधाच्या जागा निवडीची जबाबदारी वगळता सर्व स्तरावरील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना नेमुन दिलेल्या तांत्रिक, वित्तीय व प्रशासकीय जबाबदा-या व कर्तव्ये प्रचलीत पध्दतीप्रमाणेच राहतील.

**ब)** सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटांत फेरबदल करावे लागणार नाहीत, अथवा अशा पाणलोटांचा मंजूर निधी/योजनानिहाय खर्च करावयाचा निधी यामध्ये फेरबदल करण्याची वेळ येणार नाही याची दक्षता घेऊन पाणलोट पूर्ण करावेत.

**क)** या कामाची दखल प्रत्येक स्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनिय अभिलेख लिहीतांना घेण्यात यावी.

**ड)** सन 2007-08 ते सन 2013-14 पर्यंत जिल्हयांना सुकाणू समितीने मान्यता दिलेले तथापी स्थानिक परिस्थितीनुसार आय डब्लू एम पी, आर. आय डी. एफ या योजनामध्ये वर्ग केलेल्या पाणलोटांचा तपशील या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावा.

**इ)** सन 2013-14 मध्ये उपरोक्त प्रमाणे विविध निधी स्तोत्रामधून पूर्ण झालेल्या पाणलोटांचा अहवाल दि. 15/6/2014 पर्यंत आयुक्तालयास सादर करावा.

**ई)** सुकाणू समितीच्या मान्यतेसाठी पाणलोट प्रस्ताव पाठवितांना अ,ब,क,ड मधील माहिती पाणलोटाच्या मुळ डी. पी. आर. च्या गोषवा-यामधून घेण्यात यावी.

**संचालक,**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन**
**कृषि आयुक्तालय म.रा. पुणे-411001**

**प्रत :-** मा. प्रधान सचिव, जलसंधारण, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-32.

**प्रतः-** मा. आयुक्त कक्ष, कृषि आयुक्तालय, पुणे-1